**राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे.**
**जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, ५ बी. जे. रोड, पुणे – ४११००१.**
**फोन नं.** - (०२०) २६०५०६४१ **ई मेल आयडी** -sceapune@gmail.com

रासनिप्रा

जा.क्र.रासनिप्रा/कक्ष-११/बा.स./जागा,वाहने,सेवा अधिग्रहीत करणे/आदेश/८११० /सन २०२२ दिनांक ११/११/२०२२

**वाचावे** :- १. महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे कलम १४ अ (१) (अ) मधील तरतुद.
२. महाराष्ट्र कृषि उत्पन्न बाजार समिती (समितीची निवडणूक) नियम २०१७ चे नियम ३ (दोन) मधील तरतुद.
३. या प्राधिकरणाकडील आदेश जा.क्र.रासनिप्रा/कक्ष-११/कृ.उ.बा.स./जि.नि.अ./घोषित करणे/१४५३/२०२१ दिनांक २९/०४/२०२१

**प्रस्तावना :-**

ज्या अर्थी, महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे कलम १४ अ (१) (अ) मधील तरतुदीनुसार राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणूकांचे अधिक्षण, निदेशन व नियंत्रण करण्याची जबाबदारी राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणावर सोपवलेली आहे. आणि,

ज्या अर्थी, प्राधिकरणाने राज्यातील निवडणूकीस पात्र झालेल्या तसेच मा.न्यायालयाने आदेशीत केलेल्या कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणूक प्रक्रिया सुरु केलेल्या आहेत. कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणूक प्रक्रियेकरीता शासकीय किंवा खाजगी जागा, वाहने, सेवा किंवा इतर साधनसामग्री यांचा वापर करणे आवश्यक आहे. आणि,

ज्या अर्थी, महाराष्ट्र कृषि उत्पन्न बाजार समिती (समितीची निवडणूक) नियम २०१७ चे नियम ३ (दोन) मधील तरतुदीनुसार शासकीय कार्यालय, स्थानिक स्वराज्य संस्था, सहकारी संस्था यांच्याकडील कोणतीही शासकीय किंवा खाजगी जागा, वाहने, सेवा किंवा इतर कोणतीही साधनसामग्री अधिग्रहीत करून (requisition) कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणूक प्रयोजनार्थ सदर बाबींचा वापर करण्याचे अधिकार राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणास प्राप्त आहेत. आणि,

ज्या अर्थी, महाराष्ट्र कृषि उत्पन्न बाजार समिती (समितीची निवडणूक) नियम २०१७ चे नियम ३ (दोन) मधील तरतुदीनुसार अधिग्रहीत केलेली जागा, वाहने, सेवा किंवा इतर कोणतीही साधनसामग्री प्राधिकरणाकडे किंवा या बाबतीत प्राधिकरणाने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीकडे मागणी करताच सुपूर्द करणे हे संबंधित शासकीय कार्यालय, स्थानिक स्वराज्य संस्था, सहकारी संस्था यांच्यावर बंधनकारक आहे. आणि,

ज्या अर्थी, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने वाचावे क्रमांक ३ अन्वये संबंधित जिल्हयातील कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणूका घेण्याकरीता सहकार विभागातील संबंधित जिल्हयातील जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांची "जिल्हा निवडणूक अधिकारी (कृ.उ.बा.स.)" म्हणून नियुक्ती केलेली आहे. आणि,

ज्या अर्थी, महाराष्ट्र कृषि उत्पन्न बाजार समिती (समितीची निवडणूक) नियम २०१७ चे नियम ३ (दोन) च्या परंतुकानुसार अधिग्रहणाचे अधिकार जिल्हा उपनिबंधकापेक्षा कमी दर्जा नसलेल्या राज्य शासनाच्या कोणत्याही अधिकारी / कर्मचारी यांना सर्वसामान्य किंवा विशेष आदेशाद्वारे प्रदान करण्याचे अधिकार राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणास प्राप्त आहेत.

त्या अर्थी, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण निवडणूक प्रयोजनार्थ शासकीय किंवा खाजगी जागा, वाहने, सेवा व इतर साधनसामग्री अधिग्रहीत करणे संदर्भात खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

# -: आदेश :-

महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे कलम १४ अ (१) (अ) व महाराष्ट्र कृषि उत्पन्न बाजार समिती (समितीची निवडणूक) नियम २०१७ चे नियम ३ (दोन) मधील तरतुदीअन्वये प्राप्त अधिकारानुसार प्राधिकरण शासकीय किंवा खाजगी जागा, वाहने, सेवा व इतर साधनसामग्री अधिग्रहीत करणे संदर्भात खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

१. प्राधिकरण शासकीय कार्यालय, स्थानिक स्वराज्य संस्था, सहकारी संस्था यांच्याकडील शासकीय किंवा खाजगी जागा, वाहने, सेवा किंवा इतर कोणतीही साधनसामग्री यांचे अधिग्रहण करण्याचे राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणास प्राप्त अधिकार या आदेशाद्वारे "जिल्हा निवडणूक अधिकारी (कृ.उ.बा.स.)" यांना प्रदान करीत आहे.

२. जिल्हा निवडणूक अधिकारी (कृ.उ.बा.स.) यांनी निवडणूकीकरीता आपल्या अधिकार क्षेत्रातील शासकीय कार्यालय, स्थानिक स्वराज्य संस्था, सहकारी संस्था यांच्याकडील कोणतीही शासकीय किंवा खाजगी जागा अधिग्रहीत करुन सदर जागेचा निवडणूकीकरीता वापर करावा.

३. जिल्हा निवडणूक अधिकारी (कृ.उ.बा.स.) यांनी निवडणूकीकरीता आपल्या अधिकार क्षेत्रातील शासकीय कार्यालय, स्थानिक स्वराज्य संस्था, सहकारी संस्था यांच्याकडील वाहने अधिग्रहीत करून सदर वाहनांचा निवडणूकीकरीता वापर करावा.

४. जिल्हा निवडणूक अधिकारी (कृ.उ.बा.स.) यांनी निवडणूकीकरीता आपल्या अधिकार क्षेत्रातील शासकीय कार्यालय, स्थानिक स्वराज्य संस्था, सहकारी संस्था यांच्याकडील कर्मचाऱ्यांची सेवा प्रत्यक्ष निवडणूकीकरीता अधिग्रहीत करून संबंधित कर्मचाऱ्यांवर निवडणूक निर्णय अधिकारी, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी, मतदान केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी या कार्याची जबाबदारी सोपवावी.

५. जिल्हा निवडणूक अधिकारी (कृ.उ.बा.स.) यांनी निवडणूकीकरीता आपल्या अधिकार क्षेत्रातील शासकीय कार्यालय, स्थानिक स्वराज्य संस्था, सहकारी संस्था यांच्याकडील साधन सामग्री उदा. टेबल, खुर्ची, मतपेटया इत्यादी सामग्री अधिग्रहीत करून सदर सामग्रीचा निवडणूकीकरीता वापर करावा.

६. या आदेशान्वये सेवा अधिग्रहीत अधिकारी / कर्मचारी अथवा ज्यांचेकडून वाहन, जागा अथवा निवडणूकीस लागणारी साधनसामग्री अधिग्रहीत करण्यात आली आहे, असे अधिकारी अथवा व्यक्ती या अधिग्रहणाच्या कालावधीत नियम ३ (दोन) अन्वये राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाच्या पर्यवेक्षणाखाली व नियंत्रणाखाली कार्यरत असतील अशी जाणीव संबंधितांना आदेशामध्ये करून देण्यात यावी.

७. सदरचे कर्तव्य पार पाडण्यास कसुर केल्यास संबंधित अधिकारी / कर्मचारी / व्यक्ती भारतीय दंडसंहिता १८६० चे प्रकरण १० मधील तरतुदीन्वये फौजदारी स्वरूपाच्या कार्यवाहीस पात्र असतील अशी जाणीव संबंधितांना आदेशामध्ये करून देण्यात यावी.

**मा.आयुक्त, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या मान्यतेने.**

(डॉ.पी.एल.खंडागळे)
सचिव,
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

**प्रत** :-

जिल्हा निवडणूक अधिकारी (कृ.उ.बा.स.) (सर्व)

प्रत माहितीस्तव :- १.मा.पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२.सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती (सर्व)